# बालनेटाक्षरी

## (बालगोपालांसाठी)

# सुरांची मैफिल......



ई साहित्य प्रतिष्ठान

# बाल नेटाक्षरी

*संपादिका :*

सौ अनघा हिरे (नाशिक)

©2012 : ई साहित्य प्रतिष्ठान

*मुखपृष्ठ :*

आदिती हिरे

*प्रकाशन :*

ई साहित्य प्रतिष्ठान

नाम गुम जायेगा

www.esahity.com

9869674820

E mail
: balnetakshari@gmail.com

9422284116

***<u>नेटवरची धम्माल मस्ती</u>***

बच्चे कंपनी

पंधरा वर्षांपुर्वी लोकांना इंटरनेट माहित नव्हतं. ATM नव्हतं. मोबाईल नव्हते. बहुतेक लोक कॉप्युटर शिवायच काम करायचे. अजून पंधरा वर्षांनंतर इंटरनेट शिवाय कसलंच काम होणार नाही अशी परिस्थिती असेल. आता तुम्ही जी मुलं आहात ती मोठी झाल्यावर तुमचं पान इंटरनेट शिवाय हलणार नाही बुवा. पण तरीही तुमचे आई बाबा तुम्ही इंटरनेट्ला हात लावला की तुम्हाला रागावतात का ? इंटरनेट वर जास्त बसू देत नाहीत का ?

कारण माहित आहे ? इंटरनेट जितकं चांगलं तितकंच वाईट. इंटरनेटवर फ़सवणूक पण खूप असते. काय बघावं काय बघू नये याचं मार्गदर्शन नसेल तर मुलं कुठल्या कुठे वाहत जाऊ शकतात. फ़सू शकतात. कॉप्युटर बिघडू शकतो. व्हायरस येतात. त्यात इंटरनेटवर जिकडे जावं तिकडे इंग्रजीच इंग्रजी. मग आपण मराठी मुलांनी करायचं काय? आपल्याला आपलं मराठी इंतरनेट हवं की नको ? तेव्हा ई साहित्य प्रतिष्ठानने आणलंय मुलांसाठी खास मासिक. बालनेटाक्षरी. यात मराठी मुलांना लिहायला वाव आहे. आणि माहिती मिळायलाही. यातून आपण इंटरनेट कसं वापरायचं. काय बघायचं, काय टाळायचं ते सगळं समजून घ्यायचं आहे. तुम्हाला आपल्या मित्रमंडळींना काही सांगायचं असलं, गोष्ट, कविता लिहायची असली किंवा आपण काढलेली चित्रं फ़ोटो दाखवायचे असले तर आमच्या कडे पाठवून द्या. पालकांना आणि दादा ताईंना सुद्धा विनंती. आपल्या कडच्या छोट्टु कंपनीने काही कौतुक करण्यासारखं केलं बनवलं लिहीलं तर आमच्याकडे पाठवा. आपण आज कौतुक केलं तरच ती मुलं उद्या काही पराक्रम करणार ना !



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## ➢ ***<u>संपादकाच्या मनातले...</u>***

सुरांची मैफिल कशी सजली आहे बघा!

मैफिलीत तुम्हाला भेटायला कोण कोण आले माहित आहे का?

परीराणी, चांदोबा, ईवली ईवली चांदणी , ढग,

झाडी , फुले आणि फुलपाखरे, चिऊताई आणि कावळेदादा सुद्धा ,

जोडीला वाघोबा आहे हत्ती आहे मनीमाऊ आणि छान छान भू- भूदेखील आहे ,

आणि सगळ्यांचे आपले काहीना काही वेगळे सांगणे आहेच .

अं ह ... ते काय सांगतायेत हे मी नाही सांगणार काही तुम्हाला. ते तुमच्याशी मैत्री

करायला आले आहेत ना! मग चला तर त्यांच्याशी मैत्री करायला

अनघा हिरे



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## *बालगीते समावेश*

मनिषा नाईक (माऊ)

अनघा हिरे

विराज

उउपेंद्र चिंचोरे

प्राजु

अरविंद चौधरी

रजनी अरणकल्ले

यशवंत गोस्वामी

कोमल यादव

मोहिनी

प्राजक्त देशमुख

रमेश ठोंबरे

सौ शामलाअभिजित क्षीरसागर

तनवीर सिद्दिकी

सचिन काकडे

बसवराज बिराजदार

काविकुमार

सौ अनुराधा अशोक कुलकर्णी

अरुण.वी देशपांडे

## *प्रसिध्द बालगीते*

ग. दि. माडगूळकर

मंगेश पाडगांवकर

शांताराम नांदगावकर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## गिरकी ...!!

गिर गिर गिरकी
वार्याची फिरकी
फिर फिर फिरले
आभाळात शिरले...

लख लख लखाकी
चांदोमामा हाताशी
चक चक चकाकी
वीज बांधू पायाशी...

सर सर सरीने
अंग माझे ओले झाले
भर भर भरीला
ओंजळीत तारे आले...

झेल झेल झेलले
चाळणीने चाळले
खेळ खेळ खेळले
फुलावानी माळले...

रंग रंग रंगली
रात मला हासली
संग संग संगती
आभाळातून उतरली...

मनिषा नाईक (माऊ)





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## माझ्या बाळा..!

भिर भिर भिंगरी
पायाला लागली
अरे माझ्या बाळा
नको करू चाळा

चिऊ चिऊ चिमणी
अंगणात आली
थांब माझ्या बाळा
देऊ तीला दाणा

गर गर गिरक्या
घेतो बघ वारा
का रे माझ्या बाळा
डोळा अश्रू धारा

गोरा गोरा चांदोबा
दुरूनच पाहतो
बघ माझ्या बाळा
लपाछपी खेळतो

टुक टुक माकड
पहातंय कस
जा रे माझ्या बाळा
दूर जरा बस

छुम छुम घुंगरु
वाजतंय छान
पहा माझ्या बाळा
कसे हरपले भान

मनिषा नाईक (माऊ)







©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## डौलदार  हत्ती

डौलदार  हत्ती त्याची
डौलदार चाल
कुणाला सांगू नका
त्याची अवघडली मान

सोंडेचे वजन त्याला
पेलवतच नाही
पोटाची  हालचाल
सहन होत नाही


जिम मध्ये जाऊन
व्हावे स्लिम स्मार्ट
पहिल्याच दिवशी
त्याने तोडले रेकोर्ड


डायटिंग करायचा
निर्णय  घेतला
ट्रकभर केळातच
जेवायचा थांबला

डायटिंग बियटिंग नको
पुरे झाले फॅड

ठगा काही दिवसातच
मी दिसू लागेल मॅड

म्हणो कुणी  लोद्या
वा करो कुणी चेष्टा
मी माझा बरा
सुखी माझ्या जगात
(अनघा हिरे)









©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## माझा कन्हैया

आज माझ्या स्वप्नात माझा बाळकृष्ण आला
बोबड्या बोबड्या बोलातच मागितले लोणी खायला



छोटीशी स्वारी, कसा चुरू चुरू बोलतो
म्हणे खाणे नको शिकाऊ मला, मी शिस्तीतच खातो

दाऊ भैयाची खोडी काढत, स्वत बसला रडत
मार म्हणे हवे तितके मी नाही घाबरत

लटके लटके राग धरत अऩं डोके खुपत गुडघ्यात
दंग कसा झाला मनु खोटखोट रडण्यात

शोनू माझा राजा शहाणा झाला
रोज आता अभ्यास करेल म्हणाला



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

अभ्यासात आता नको श्लोक वाणी
हवी त्याला एबीसीडी तिही रिदम गाणी

गाई चरायला स्वारी आता जाणार नाही
बॅटबॉल, बुद्धिबळ त्याला नवे नाही




गोड गोड बोलत त्याने फोन केला
खेळायला नवी खेळणी हवीय त्याला

एक सत्य मात्र त्याने सांगितले जाता जाता
प्रेमाची तू यशोदामैया ,जन्मदात्री देवकीच माझी माता



नंदाचा लाडला माझा कन्हैया
मला आज चक्क म्हणाला मैया
मला आज चक्क म्हणाला मैया....

अनघा हिरे



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## थांब थांब रे मेघा

जाऊ नको दूर दूर
आता येणार उन्हाळा
मनी माझ्या हूर हूर

माझ्या पायी पसरली
उसळती जाळ निखारे
तग मग त्या जीवाची
कशी करती पाखरे

रखरखती जमीन
नदी नाही हासत
गाई गुरे जमा होती
कुठे हे झरे आटत

उसळतील बघ
नभ पेटती वारे
दाही दिशा पेटल्या
गरम निखारे

झाड झाड मोहरले
आली नविन पालवी
लागली चैत्राची चाहूल
शोधी नविन सावली

नको नको जाऊ मेघा
थांब अजून थोडा
रखरखत्या उन्हा
जीव झाला थोडाथोडा.

(अनघा हिरे )







©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

"नको थांबवू मजसी

...नको अडवू मजसी
पुनः येणारच आहे
आषाढाच्या प्रतिपदी

दूर तिथे कुणीतरी
आहे वाट गं पहात
तिथे देखील धरित्री
आहे उन्हात नहात

पांढुरले बघ ढग
जल त्यातील संपले
फक्त सावली करिता
नको थांबवूस मले
थोडे जातो तिथे दूर
पार दक्षिण दिशेला
आणि येईन घेऊन
पुनः भरून मेघाला

वाट बघ तू तोवरी
नको होऊ कासावीस
दिल्या शब्दाला जागून
पुनः ओतीन धारेस...
...विराज





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

|| घड्याळोबा तुझी वेगळीच त-हा ||

घड्याळोबा तुझी, वेगळीच त-हा |
झोपेचे माझ्या कां, वाजवितो बारा ||१||

गजराने तुझ्या, होई घर जागे |
कसं काय बुवा, आम्ही सरे मागे ||२||

पाय नाही तरी, कसा रे चालतो ?
टिक, टिक सदा, किती रे बोलतो ||३||

धाक तुझा भारी, आई दाखविते |
अभ्यासाला मला, रोज उठविते ||४||

आई आणि बाबा, फक्त तुझे मित्र |
माझ्या संगे कां रे, वागशी विचित्र ||५||

भीती तुझी अशी, जसा की आजोबा |
त्यांच्याहुनी मोठ्ठा, झाला घड्याळोबा
||६||

तुला नाही पाटी, नाही तुला शाळा |
सांग मज गड्या, मोठठा कसा झाला ?
||७||

पाहिजे कां तुला, साप्ताहिक सुट्टी |
बघ तुझी माझी , होईल रे गट्टी ||८||

घड्याळा तुला मी, गाऊ कां अंगाई ?
खटयाळा तरीही, निजणार नाही ||९||

बरे बाबा तुझे, ऐकीन मी सारे |
आज मात्र मला, झोपू दे जरा रे ||१०||

उपेंद्र चिंचोरे





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## <u>खलं खलं शांग आजी माझं काय चुकलं???</u>

कशाला गं आईनं असं मला माललं..
ललून ललून नाक माझं लाल लाल झालं..
खलं खलं शांग आजी माझं काय चुकलं???

अंगणामध्ये गेले होते बिश्किट खात खात..
टॉमी तिथे बसला होता त्याचा खाऊ खात..
माझ्यातलं थोलं बिश्किट मी त्याला शुद्धा दिलं..
त्याच्या भांड्यातलं थोलं मी ही खाल्लं..
सगल्यांना देऊन खायचं असं आईनीश शांगितलं..
खलं खलं शांग आजी माझं काय चुकलं??

बाबांचा पांधला पांधला रूमाल मला मिलाला
त्याच्यावर केचपचा मी लाल सूर्य काढला..
त्यावर मग मी थोडंसं दूध सुद्धा ओतलं..
सांग आता यात माझं असं काय चुकलं..??
रूमाल सगळा लाल लाल ,होता घाण झाला..
दूध ओतून त्याला मी गोला गोला केला..
कलतंच नाही मला नेमकं काय झालं.
खलं खलं सांग आजी
माझं काय
चुकलं??....... - प्राजु





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

होईन कधी मी मोठा ,आई

होणार कधी मी मोठा ?

मला वाटते मोठे व्हावे,
खिशात पैसे खूप असावे,
पोटभर चॉकलेट खावे ,
हळूच मस्त झोपी जावे

नसावी मज उठायची घाई ....
होईन कधी मी मोठा ,आई

जीव सानुला हा जरी,
ओझे किती पाठीवरी !
तोंडपाठ सदा असावे
बे चे पाढे ओठावरी

कंटाळलो या शाळेला आई
होईन कधी मी मोठा ,आई


तीच ती रोजची वाट,
नकोच आता गृहपाठ
कान्ह्याच्या वासरासम,
वाटे सुटावे मोकाट...

नसो कशाची चिंता कांही ...
होईन कधी मी मोठा ,आई

मोठा जर का झालो मी,
मुकणार तव कुशीस मी
वात्सल्याच्या ओलाव्यास्तव,
अहर्नीश तडपेन मी....

नाही व्हायचे मोठा, आई
मजला नाही व्हायचे मोठा

------ अरविंद चौधरी





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## माकड मामा..



माकड मामा
घालुन पायजामा
निघाले एका मेजवानीला
गळ्यात स्कार्फ़ अन
काठी मिरवत
ऐटित निघाले नटुन थटुन,

घरात गेले पाटावर बसले
खिरीची वाटी समोर आली
खीर होती गरम गरम
मामा ने गीळली गपकन
जीभ अशी पोळली
तसेच उठले पटकन

पायजामा सुटला
स्कार्फ़ ही पडला
मामा तसाच धावत सुटला
काठी तेथेच विसरुन गेला !.

रजनी अरणकल्ले



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>बंडु मामा.</u>

बंडु मामा, बंडु मामा बोलत का रे नाहीस?
भाचीची कोडी तुझ्या सोडत का रे नाहीस?

शेळीची दाढी नाम्या करत का रे नाही?
मांजराच्या मिश्या बाबा कापत का रे नाही?

दात मंजन केल्या शिवाय आई दुध देईल काय?
न साबण लावता आज अंघोळ होईल काय?

दोरी खेळत ईकडुन तिकडे सुर्य का रे रोज पळतो?
फळ्यावरील गोल चंद्र, देव रोज का रे थोडा पुसतो?

येशु, सँटा सोबत गाण्यात राम-रहिम दिसेल का?
शाळे मधे प्रेअर सोबत मीस श्लोक गातील का?

-यशवंत गोस्वामी





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

तुग्डूक तुग्डूक घोड्यावर

चल तुग्डूक तुग्डूक घोड्यावरून
जाऊ आपण माऊ
जाता जाता खिशातली
डेरिमिल्क सिल्कि सिल्क खाऊ


मोगली आणि सिंबाच्या जंगली
दूर दूर जाऊ
बलूच्या खांद्यावर बसू
त्याची गम्मत गम्मत करू

शिन्चॅन्च्या घरी जाऊ
केक खाऊन येऊ
त्याची आई काठी घेऊन मारण्याआधी
काठीच लपवून ठेवू

जाऊ अड्ड्यावर बेन टेन च्या
खिशात घालून त्याचे गॅजेट्स घेऊन
येऊ
येता येता ऍशचा पिकाचू आपण घेऊ
मग तुग्डूक तुग्डूक घोड्यावर टूणकन
बसून येऊ

चांदोमामा आल्यावर आपल्या
खिडकीवरी
तुग्डूक तुग्डूक करत येऊ आपल्या घरी
आई आल्यावर म्हणेल आपल्या घरी
तुग्डूक तुग्डूक घोड्यावर झोपली माझी
परी

कोमल यादव





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>माऊची बाळ</u>

मऊ मऊ ...
छान छान ...
किती किती ..
गोरी पान ...

घारे घारे ..
डोळे किती ..
मिचकुन ..
दूध पीती...

दूध पीती ..
चुट्ट चुट्ट ..
चाले कशी ..
लुट्ट लुट्ट ..

लाडीगोडी ..
लावे कशी ..
घुटमले..
ती पायाशी ..

माऊ ताई ..
आली आली ..
माऊ बाळ ..
खुश झाली ..

बाळ सारी ..
ती निजली ..
तू ही निज ..
ग सानुली ..

मोहिनी







©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## चिमण पाखरं

चिमुकल्या पावलांच्या
बोबड्याच चाली
चाल रुणझुण नुपुराची
छुमछुम गाणी ॥

भिरभिरणारे डोळे
त्याचे भाबडेच हसु
धडपडत चालणॆ
कधी क्षणिकच आसु ॥

हात-पाय त्याचे डोळॆ
मिचमिचुनीया पाही
डोळॆ पाणावे निमिष
मग हसतच राही ॥

दुडूदुडू धावतांना
घुटमळॆ पायातुनी
थबकुन बसे खाली
सरसर सरसावी ॥

बोबड्या हातांनी
त्याचे बोबडेच चाळॆ
मागे वळुन पाहता
त्याची हालणाअरी पाळे ॥

पाही एक एकटक
देहभान हरपुनी
पुढे सरके हळुच
कधी मागे सरकुनी ॥

खाई कधी काहीबाही
मुख माखे कसे भारी
टकमक चहुबाजु
त्याची कृष्णकाया सारी ॥

स्वप्न पापण्यांच्या आड
आज थरथरणारी
इवल्या हातात
उद्या गरुडभरारी ॥

-प्राजक्त देशमुख





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>आज आस व्हायलाच हवं</u>



आज आस व्हायलाच हवं
उंदरांन राजा आज व्हायलाच हवं
सिहाने जाळ तोडून जायलाच हवं
वाघाचं पोट दुखत तेव्हा
मावशीन त्याच्या यायलाच हवं
खर्- खर् आज आस व्हायलाच हवं ||१||

शेळीन शहान आता व्हायलाच हवं
कोल्ह्यांन विहिरीत रायलाच हवं
कासवान मध्ये काही खायलाच हवं
सस्याने डोंगरावर आधी जायलाच हवं
खर्- खर् आज आस व्हायलाच हवं ||२||

सस्याच्या डोक्याला हत्तीचे कान
सिंहाला यावी जिराफाची मान.
लांडग्याने मोडलेलं शेळीच लग्न
लग्न आज ते व्हायलाच हवं
खर्- खर् आज आस व्हायलाच हवं ||३||



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

सगळीकडे असावीत छान - छान मुलं.
चड्डी घालून सगळी फूलावीत फुलं.
कामळान फुल छोटं द्यायलाच हवं,
मोगऱ्याच फुल रंगीत व्हायलाच हवं
खर्- खर् आज आस व्हायलाच हवं ||४||



मोराने बासरीवर डुलायला हवं
सापांन पिसा-यात झुलायला हवं
कोकीळेन गोड - गोड बोलायला हवं,
रातराणीन दिवसाची फुलायला हवं,
खर्- खर् आज आस व्हायलाच हवं ||५||

पुढच शतक आज यायलाच हवं
उद्याच चित्र आज दिसायलाच हवं
सगळीकड दिसतील डोंगर ओके - बोके
उजाड - माळांची उघडी- उघडी डोके
निसर्गाचं गीत आज गायलाच हवं
एक तरी झाड त्याला द्यायलाच हवं
खर्- खर् आज आस व्हायलाच हवं ||६||.- रमेश ठोंबरे



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## चिट्टीशी गट्टी




शाळा सुटल्यावरती बाहेर भेटला मला चिट्टी,
ओळखले मी त्याला, आमची जमली छान गट्टी,
चिट्टी म्हणाला  "तुलाच आलो मी इथे भेटायला"
मग मला खूप आश्चर्य लागले होते वाटायला.

"तू मला सॉलिडच आवडतोस" मी म्हणालो त्याला
"किती आनंद झाला मला शब्दच नाहीत सांगायला
बोल ना रे चिट्टी दादा मित्र माझा बनशील का?
तुझ्यासारखाच बुद्धिमान मला तू बनवशिल का ?"

चिट्टी म्हणाला "कबूल मी मित्र तुझा आजपासून"
एका बाकावरती बसलो, जरा दूर शाळेपासून
म्हणले "डब्यात पोळी भाजी खायची का तुला?
एवढ्या लांबून आला आहेस थांब देतो खायला.

पण आधी मला सांग तुला ठेवले होते खोलून,
मग सायन्स गॅलरीतून आलास काय पळून?
डॉक्टर वसीला कळले तर येईल न्यायला तुला
नाहीतर पोलिसतरी येतीलच ना रे शोधायला."
चिट्टी म्हणाला  "तू नको काळजी करू अजिबात
आता कोणतीही रेड चीप नाही बाळा माझ्यात.
डॉक्टरला  मी सांगून आलोय जातो तुला भेटायला
कोणाचीच भीती नाही आता आपल्याला बोलायला"



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )



मी म्हणालो “चिट्टी दादा तू का केलेस चीटिंग?
सनाला कॉपी कराया लावलेस छान सेटिंग.
आई आणि टीचर म्हणतात करू नये कॉपी.
गुरुजनांना फसवणारा बनतो मोठ्ठा पापी.”

चिट्टी म्हणाला “आय एएम सॉरी माझे खरे चुकले
पण ती गरजू होती ,तिला मदत करावी वाटले.
बर मला सांग चिंटू टिफिन का नाही खाल्ला?
आईने पाहिल्यावर ती करेल ना हल्ला गुल्ला?”

मी म्हणालो “तुला एक सीक्रेट गोष्ट सांगतो
शाळेतून काल मी नी सोनू घरी जात होतो
जाता जाता वाटेत सापडली वीस रुपयांची नोट
आश्चर्याने दोघांनीही घातले तोंडात बोट.

कालच मॅथ्स पीरियडला शिकवले होते “मनी”
तेव्हा ट्वेंटी रूपीज नोट दाखवलेली मिसनी.
दोघांनी पाहताच ओळखले ती नोट विसची
मी म्हणालो देऊ मिसलाच असेल बहुधा मिसची.”

सोन्या म्हणाला ‘नाही नाही ,उद्या भेळ खाऊ
मधली सुट्टी झाली की मग टपरीवरती जाऊ’
भेळ म्हणताच माझ्या तोंडी येऊ लागले पाणी
भेळ खाल्ली, नाही खाल्ला टिफिन दोघांनी”

चिट्टी म्हणाला “सांग काय आवडते माझे?
मी म्हणालो रेड चीप सोडून सर्व काही तुझे

तो म्हणे “का नाही तुला रेड चीप आवडत?
तुझ्यातही तू एक रेड चिप आहेस वाढवत.”



जाम घाबरलो मी आणि झालो कावरा बावरा
म्हणालो “मला कधी भेटले डॉक्टर बोरा?”
तो म्हणे “खोटे बोलणे एक रेड चिपचाच भाग”
टिफिन नाही खाल्ला आईला फसवलेस आज.

सापडलेले पैसे नाही दिलेस मिसला परत
त्याच पैशात भेळ खायची होती काय गरज?”
मी म्हणालो “मी नाही सोन्या असे म्हणालेला”
तो म्हणाला “तेच तर कस समजत नाही तुला”

लक्षात ठेव रेड चिप  आहे खूप स्वस्त
ती लावल्यावरही बाळा वाटते खूप मस्त
चिंटू बाळा वाईट संगत म्हणजेच रेड चिप
कधी खोटे नको बोलूस, नको शिकू वाईट

आई बाबा, गुरुजन देतात चांगले संस्कार
त्याचे महत्व तुला बाबा कळेल उशिरा फार.
आयुष्यात बाळा नेहमी दोनच गोष्टी कर
आईबाबांचे ऐकत जा नि चांगली संगत धर”

मी म्हणालो “माफ कर चिट्टी दादा मला”
सोडून देइन वाईट संगत माझा वादा तुला
परत कधी परके धन विचारात नाही घेणार
मग नाही माझ्यात कधीच रेड चिप वाढणार!!

सौ शामला  अभिजीत क्षीरसागर, बारामती



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

# वाघोबाचे लग्न

जंगल मे होना   था मंगल वाघोबाचे लग्न,
प्रत्येक जण  आपल्या कामात होता किती मग्न
बगळा बांधत होता तोरण जंगलाच्या गेटला  ,
तेवढ्यात तिथे त्याला काळा करकोचा भेटला.



खारुतई बांधत होती झाडांवरती फूलमाळा
मदत करायला तिला आला होता कावळा
लांडगा होता वॉचमन तिथे लक्ष ठेवायला,
तो सुद्धा फुले माळा लागला होता लावायला

मनिचा तोराच वेगळा म्हणे मी वरमावशी
माझ्या बहिणीचा मुलगा आहे मोठा हौशी
मला त्याने घेतली आहे, पैठणी नऊवारी
म्हणून  मोतियची नथ घातलीये मी भारी.

हत्ती होता पाणी भरत स्व्यंपाकासाठी
एका सोंडेतच अख्खी, भरत होती टाकी
सोन्याचे दागिने घेऊन येत होता जिराफ,
तोच तर एकटा होता, जंगलामध्ये सराफ.

अस्वल वाघोबाला बंधित होता मुंडावळे
अंगठी सोन्याची बोटात त्यात होते पोवळे
वाघोबाने नेसले होते ऊंची रेशमी पीतांबर
अंगरखा वरती लाल , किनारी सोनेरी जर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

पक्कान्नांचा सुटला होता मस्त घमघमाट,
लग्न लागल्यावरती होता, जेवणाचा थाट
मेनू खास निवडक, होता सुंदर मेजवानी
स्टार्टर मध्ये सूप सोबत नूडल्स शेझ्वानि



मस्त जाफरानि पुलाव त्याच्यासोबत दही
कोशिंबीर होती फळांची, चटणी होती सही
आलू परांठा होता, त्याच्यासोबत होते बटर
भाजीची तर काय लज्जत मस्त पनीर मटर

आईसक्रीमही होते आणि होत्या स्वीट डिश,
थंड गार खीरीवरती सजवलेले  किशमिष
जेवण झाल्यावरती खायला मिळणार होते पान
पाहुण्यान्च्या करमणुकीला ऑर्केसट्रा ही छान

संगीत रजनी होती मस्त अरेंज केलेली
कोकिळा गाणार होती 'चिकनि चमेली'
मैना करणार होती नृत्य भरत नाट्यम
धीवर पक्षी करणार होता मोहिनि अट्ट्म.

माकड भटजी सांगत होते मुहूर्ताच्या वेळा
वाघोबांच्या मित्रांचाही जमला होता मेळा
लग्नामध्ये प्रमुख पाहुणे येणार होते कोण?
जंगलातले दोन आणि परदेशातले दोन



जंगलातले मुख्य पाहुणे आले सिंह महाराज
सिंहिणीने घातला होता कोल्हापुरी साज
दूसरा पाहुणा जंगलातला आला होता ऊंट



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

एकमेकाना पाहून त्यांचा दाटून आला कंठ

परदेशाचे पाहुणे आले म्हणून ऊडवली दारू
चकित झाले सारे पाहून, शहामृग कांगारू
लग्नाची शोभा वाढली खरी आला जेव्हा मोर
लांडोरीने कपाळी लावली होती चंद्रकोर

सारे म्हणू लागले आता चला करा घाई
बँड वरती कबुतर वाजवू लागले सनई .
सारे काही आहे खरे पण कुठे आहे नवरी?
नवरी कोण हीच मजेशीर गोष्ट होती खरी.

संगीत वाजू लागले “गोऱ्या गोऱ्या गालावरी”
लाजत लाजत आली नवरी बोहल्यावरि
नवरी मुलगी होती सुंदर हरिणी गोजिरी
चिंता नका करू वाघोबा झालेत शाकाहारी॰





सौ शामला अभिजीत क्षीरसागर,



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>देवबाप्पा भेटला</u>




बाहेर खेळताना एकदा भेटला देवबाप्पा
दोघे मिळून ओट्यावरती मारीत बसलो गप्पा
माझ्या कडे होती कॅडबरी, त्याने पेढे आणलेले
माझी कॅडबरी त्याने , तर त्याचे पेढे मी खाल्ले.

देवबाप्पा देवबाप्पा , खर खर सांग,
तुझे घर आहे कारे खरच खूप लांब?
दोन तीन वर्षापूर्वी आज्जी तिकडे आली,
बघनारे नाही अजून  घरी परत आली !

जमलच तर तिला एकदा दे ना  रे पाठवून
तिला म्हणावं नात रडते खूप तिला आठवून
म्हणावं तिला की मला झोपच येत नाही
राजा राणीच्या गोष्टी कोणी सांगतच नाही.

शाळेतून  घरी येते तेव्हा असते एकटी
टॉम अँड जेरी तरी बघणार मी किती!!
तू होतीस तेव्हा तुला मी होते बिलगत
शाळेत खाल्ले मीच , आता तूच भरव म्हणत.

तिला म्हणावं घरी येणार आहे  नवीन बाळ
आंघोळ त्याला कोण घालील होईल आबाळ?
लाड या मग लाडोबाचे करणार कोण?
तिला म्हणावं कमीत कमी कर एक फोन



©बाल-नेटाक्षरी (ई  साहित्य  प्रतिष्ठान 2012 )

आई म्हणते आता ती परत नाही येणार.3
देवबाप्पा प्रॉमिस , तिला त्रास नाही देणार.
माझे जेवण रोज माझ्या हातानेच जेवेन
तिला सांग मी तिचे पाय देखील चेपेन.

प्लीज प्लीज देवबाप्पा तिला सांग एकदा
त्रास दिला असेल तर सॉरी म्हणते तीनदा
रात्री गोष्टी  सांगायचा करणार नाही हट्ट
करमत नाही तुझ्या विना एकदाच ये ना फक्त!!!!

सौ शामला अभिजीत क्षीरसागर,
बारामती

## मला टीव्ही त जायचय!!!

बाबा , अहो बाबा, मला टीव्ही त जायचय
काहीही करून मला टीव्ही वर दिसायचय
प्रत्येक चॅनलवर फक्त मीच दिसायला हवा
मग बाबा तो चॅनल , जुना असो की नवा

सोनी वरचा मग असेन रोबोट पण मीच
झी टीव्ही वरचा असेन रा-वन पण मीच
मलाच बनू देत ना स्टार प्लस का द्बंग
आजतक च्या बातम्या सांगेन मीच खमंग

फॅशन टीव्ही वरचा डिजायनर मीच असेन
स्टार मुवीज वरचा असेन मीच जॅकी चेन
एम टीव्ही वरची असेन बेबो पण मीच
मुलगा जरी असलो तरीही शीला पण मीच.

संस्कार चॅनलवर मीच सांगेन प्रवचन
साम वर बालाजी तांबे हेल्थ सोल्यूशन
झी टीव्ही वरती दाखवेन मीच कुकरी शो.
स्पोर्ट्स चॅनल वरती खेळेन मीच पोलो.


काही चॅनेल्स वरती बाबा दिसायचे नाही मला
कार्टून नेटवर्क, हंगामा, डिज्नी आणि पोगोला
त्या चॅनल वरती बाबा मला अजिबात यायचे नाही
कारण माय डियर बाबा, तुम्ही ते पाहत नाही

कामावरती जाता तुम्ही , मी जातो शाळेला
तुम्ही घरी येता तेव्हा मी जातो ट्यूशनला
तेथून आल्यावर वाटते, तुमच्यासोबत मस्ती करू
आई म्हणते, दमलेत बाबा,बाळा नको डिस्टर्ब करू

त्यावेळेला तुम्ही माझ्याशी बोलत नाही जास्त
स्टार न्यूज अन स्पोर्ट्स मध्ये तुम्ही असता व्यस्त
चॅनल बदलण्यातच तुमचे दंग असते ध्यान
वाट पाहून मी झोपी जातो, याचे नसते तुम्हा भान

म्हणूनच बाबा मला टीव्हीत जाऊन बसायचे आहे
टीव्ही वरचा प्रोग्राम बनून तुम्हा समोर राहायचे आहे
माझ्या बरोबर वेळ तुमचा मग जाईल जास्ती
मग तरी माझ्याबरोबर करालच ना मस्ती?

सौ शामला अभिजीत क्षीरसागर, बारामती





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## ग 'राजू'

एकदा राजूला आला
आईचा जाम राग
आईलाही आला
राजूचा वैताग

राजू म्हणाला
मी करतो उपवास
चोकलेट दिल्याशिवाय
घेणार नाही घास

आई मग ओरडली
माझे काय बिघडते?
भूक लागली तर सांग
पोळी भाजी वाढते

इथे राजूचे मन
करू लागले विचार
आपण जेवण सोडले
तर काय काय होणार?

की ताई आपले
नखरे कमी करणार?
का दादा धांदल
उनाडक्या सोडून देणार?

का आई आपली
रागावून संपावर जाणार?
की बाबा कंटाळून
रजेवर राहणार?

समोर दुध असूनही
मनी ताव नाही मारणार?
का गोड पेरू देवूनही
मिठू तोंड मुरडणार?

हे तर सर्व होतच राहणार
राजूच्या मनानेही दिला होकार
मग त्याने शरणागती पत्करली
मुकट जावून पोळी भाजी खाल्ली

@ तनवीर सिद्दिकी.





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## राज्य



चल... चिऊ चल दोघं खेळायला जाऊ
गार - गार वा-याशी पुन्हा शर्यत लाऊ

बघ.. चिऊ सुटा सुट जास्त वेळ नाही
तुझं राज्य आलं म्हणुन रडायचं नाही

सांग चिऊ सांग आता डोंगर का पाणी ?
का डोंगरावरुन दोघही म्हणुया गाणी ?

थांब चिऊ. बघ आता हात जाळी घेतो
गर - गर भोवरा.. तुझ्या हातावर देतो

गेला चिऊ गेला पतंग आभाळाला गेला
म्हातारीच्या केसासारखा वा-याने नेला

ती चिऊ ती. बघ ना त्या चांदण्यात परी
आजीच्या.. गोष्टीसारखी आहे ना खरी ?

चिऊ तुझी माझी गोष्ट अशीच आहे ना ?
मग तुझं राज्य उद्यापण मलाच दे ना...

---सचिन काकडे



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

माझिया ग अंगणात....



माझिया ग अंगणात
आली इवली पाहुणी
खुदू खुदू हसते ग
छोटे माझे बाळ गुणी

माझिया ग अंगणात
येते एक चिऊताई
बाळाच्या इवल्या ओठांत
घास इवलासा देई

माझिया ग अंगणात
बाळ दुडूदुडू धावे
वाटे तिच्या सोबतीने
गावी स्वप्नांच्या जावे

माझिया ग अंगणात

हळू पाळणा हालतो
नभी ढगांच्या आडून
चंद्र बाळाशी खेळतो

वाघाची मावशी....

बसवराज बिराजदार

वाघाची मावशी मनीमाऊ छोटीशी
सिप सिप करताच उडी मारी इवलीशी

शांपूबिंपू काही नको तरी किती छान
चाटत बसते स्वतःला आवडेना घाण

म्याँव म्याँव करत घोटाळते पायात
लाड करुन घेते मावशी ही तोऱ्यात

टॉमी समोर येताच गुरकते केवढी
केस फुलवून म्हणते मी तर
तुझ्याएवढी..

बसवराज बिराजदार



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## बाळासाठी……. बसवराज बिराजदार

एक दाणा चिऊसाठी
एक घरटे काऊसाठी

एक घास हम्मासाठी
एक वाटी माऊसाठी

एक बिस्किट भू भू साठी
एक अंगाई चांदोबासाठी

एक गाणे बाळासाठी
गोड गोड पापीसाठी



## पोपटराव पोपटराव..

हिरवी शाल, लाल चोच
गळ्याभोती काळा गोफ

कसले भारी दिस्ता राव
पोपटराव पोपटराव

मिरच्या खाता तिखटजाळ
पेरुबरोबर ओली डाळ

शिट्ट्या बडबड किती किती
झोके घेता दांडीवरती

आवाजाची मस्त नक्कल
कुठून एवढी आणली अक्कल

बसवराज बिराजदार



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## बाप्पा, बाप्पा ऐकतोस ना ?

रोज करते नमस्कार
अग्दी वाकून वाकून तुला
चुकून सुद्धा देत नाहीस
सुट्टी एक दिवस शाळेला........

किती बाई सांगते याला
मोठ्ठा मोठ्ठा पाऊस पाड
ग्राऊंड बागा सोडून साऱ्या
शाळा तेवढ्या बंद पाड

किती माझे हात दुखतात
एव्ढाऽऽ होमवर्क लिहिताना
उमटू दे की आपोआप
नुसती वही उघडताना

कसलं भारी दिस्तं
फुलपाखरु भिर्भिरताना
एक्दा तरी पंख दे ना
मज्जा येईल उडताना.......

एकदाच अस्सा कोन बनव
आईस्क्रीम मस्त खाताना
संपणारच नाही तो
यम्मी यम्मी म्हणताना.......

बाकी काही नाही केलेस
तरी म्हणेन जाऊं दे
आज्जी मात्र पुन्हा माझी
लग्गेच घरी पाठवूं दे.........

किती सांगावे लागते तुला
नक्की तू ऐकतोस ना रे ?
मग जर्रा मान हलवून
'हो' तरी म्हण की रे .......

बसवराज बिराजदार



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

केव्हा.....केव्हा... केव्हा...

आई मी अज्जून लहानंच का गं
ओट्यावर कप ठेवणार केव्हा...

फ्रॉक छोटासा किती दिवस हा..
ओढणीचा ड्रेस घालणार केव्हा...

बांगडी ही असली जाऊन एकदा
मस्त घड्याळ येणार केव्हा....

टॉक टॉक सँडल वाजवीत सही,
स्कूटीने भुर्रSSSS जाणार केव्हा....

कापतेस माझे केस सारखे
अश्शी हेअरस्टाईल करणार केव्हा....

खेळण्यातला फोन नुसता वाजतो
टचस्क्रीन भारी मिळणार केव्हा....

दूध, कॉम्प्लान नाहीतर कोको
कॉफी शिप शिप करणार केव्हा...

रुमाल नक्कोय हा फ्रॉकवरचा
छोटीशी पर्स देणार केव्हा...

"अग्गोबाई एवढं पुरे का...
आमच्या या मोSठ्या बाईसाहेबांना..
मावशीएवढी झालीस की बाळा
सगळंSS देईन तुला मी तेव्हा..."

"मीSSS मावशीएवढीSS ....
............नको गं आई काहीच नको
मग
...........कडेवर तुझ्या मी मावेन का
तेव्हा ??....."



-

बसवराज बिराजदार



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

चांदोबाची गमाडी - गम्मत !

चांदोमामा गोलम गोल
गोल गोल ढोल मटोल

केला आईकडे हट्ट खूप
कमी झाले साखरतूप

साखरतूप कमी झाले
चांदोबा बिचारे रडू लागले

रडता रडता मुळुमुळु
चांदोबा वाळले हळुहळु

रुसुन चांदोबा दडून बसले
कोणालाही नाही दिसले

आईने पुन्हा देता खाऊ
चांदोबा हसून लागले डोकाउ

हसतात कसे ओठातून
चंद्रकोर दिसते उठून !



बसवराज बिराजदार



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

सोनपरिच्या जगातून

वाढदिवसाच्या पार्टीला आला होता डोरेमॉन
नोबीताही होता सोबत दिसत होते दोघे छान
माझ्यासाठी त्याने एक आणली होती भेट
चमचमता रॅपर वरती आत होते गॅजेट.

डोरेमॉन म्हणाला खास तुझ्यासाठीच हे
निळे बटन दाबताच जाशील हवे तिथे
एखादे चित्र पाहून त्यावर ठेवशील हात
निळे बटन दाबतच पोचशील तिथे क्षणात.

लाल बटन दाबल्यावरती येशील तू परत
गॅझेटचा वापर कर खूप मजा करत.
मैत्रिणीलाही घेऊन जा तुझ्याबरोबर
निघतो आता परत येईन विचाराया खबर

शाळेतील गोष्टीचे पुस्तक त्यात होती परी,
तिच्या जगतील चित्र होते एकदम भारी
सोनपरिच्या चित्रावरती ठेवला हात
निळे बटन दाबले तिथे पोचले क्षणात.

सोनपरिच्या जगात, मऊ मऊ गवत
झाडांवरती फळे किती होती लटकत
फुलपाखरे आणि ससे होते बागडत
हरिणेही होती इकडून तिकडे पळत

फुले रंगीत रंगीत होता गोड सुवास
वेगळीच एक बाग होती मुलांसाठी खास
मुलांच्या बागेमध्ये चॉक्लेट चे झाड
कॅडबरीच्या झाडालाही लागला होता पाड

गुलाबाच्या फुलांना नव्हता अजिबात काटा
कमळालाही जाळी नाही किती सोप्या वाटा
मोर तर नाचत होता थुई थुई थुई
त्याच्या सोबत नाचायला खारुताईची घाई.

फिरून फिरून खूप दमले लागली तहान
समोरच दिसला एक बंगला महान
त्यात गेले आणि पाहिले होती सोनपरि
चमचम करीत होती अगदी सोन्यापरी

तिच्याजवळ जाऊन म्हणाले माझे नाव राणी
तहान लागली देशील का प्याया मज पाणी
सोनपरिने दिले मला पाणी आणि रसना
म्हणे "बाळा ,ये जरा माझ्या जवळ बसना"

पहायचे होते तुझे जग म्हणून आले इथे
इतके सुंदर नाही काही उरले आमच्या तिथे
पृथ्वीचे प्रदूषणाने केले आहे वाटोळे
आता तिथे खूप कमी केशरचे मळे.

म्हणूनच ग परिरणी आले आहे इथे
अजून काय काय मजा सांगशील का इथे
सोनपरीने मग दाखविली लाडवांची शेते
त्यातच मध्ये मध्ये पेढेही उगवले होते



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

मग तिने दिले मला  काजू आणि बदाम
तूप पोळीसोबत दिली गोड खीर छान
बडीशेपच्या गोळया दिल्या जेवण
झाल्यावर
खाऊन लाल गोळया जीभ झाली लालसर.

सोनपरीने दिला माला सोन्याचा ड्रेस
म्हणाली याला नाही लागत करावे प्रेस
ड्रेस घालून पाहताना एक जांभई आली
सोन्याचा बिछाना माझा झोपूया म्हणाली



मग मात्र मला आली आठवण आईची
झोपही येऊ लागली होती मला घाईची
सोनपरी म्हणाली माझी सोनियाची उशी
पण मला हवी फक्त आईचीच कुशी

रडू लागले जोरात मला आईकडे जायचे
तिच्या सोबत तिच्या कुशीतच झोपायचे
लाल बटन दाबायचे झाले एकदम ध्यान
आईच्या कुशीहुन नाही कुठेच काहीच  छान

सौ शामला  अभिजीत क्षीरसागर, बारामती



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>एकदा काय झाले ?</u>




एकदा काय झाले, गेलो फिरायला बागेत
कंटाळ मुळी आला होता बसून एका जागेत
सोबत होता चिनू दोघे खेळलो खूप
मज्जा आली खेळून खाऊ लागलो रोटी तूप.

लोळत होता चिनु मजेत गवतावर
मी म्हणालो फिरून येतो अजून घडिभर
गेलो झाडपाशी एका होते ते आंब्याचे
सहजच उभ्या उभ्या मी तोडले पान त्याचे

आवाज आला "का रे बाळा असे का केलेस,
तुला मी काय केले, म्हणून पान तोडलेस.?"
मी म्हणालो कोण बोलतय"आंब्याचे का झाड?"
एकच तर पान तोडले , बिघडले नाही फार.

झाड म्हणाले "का बरे मला नाही का दुखत"
मी वदलो "उभा तू नुसता इकडे तिकडे बघत
तुला कधी आहे होमवर्क का आईचा मार ?
शाळेत कधी जातच नाहीस खातोस हवा गार"

बघ एकदा माझ्यासारखे दप्तर घेऊन पाठीवर,
नुसतीच तुझी ऐट आहे तुझ्या पानावर काठीवर
एकदा करून बघ घरी माझ्यासारखा होमवर्क,
किती रडावे लागते बघ एकदा मिळवायला पर्क"

झाड म्हणाले "ठीक आहे काय नाव तुझे?"



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

मी 'ज्ञान ' सांगताच म्हणे "जरा ऐक माझे.
आत्तापसून मी बनेन तू म्हणजेच ' ज्ञान'
तू मात्र मी बनशील म्हणजेच 'झाड, पान'"

मनात म्हणालो अरे व्वा , पण चेहऱ्यावर अम...
झाड म्हणाले " बार बाबा , फक्त दोनच दिवस "
मनात म्हणालो " किती मज्जा , नाही शाळा कटकट
आता खाऊ देत त्याला फटके , गुरुजींचे फटाफट"

झाड झाला ज्ञानू , आणि गेला पटकन निघून,
येतो उद्या सायंकाळी असे हसत सांगून.
त्याल दिसला चिनु, गेले दोघे पळून
चिनू समझे झाडा ज्ञानू , घेतले मी हसून

आता मात्र माझ्यात सारे बदल होऊ लागले.
आली पायतून मुळे, जमिनीत ॠतु लागले
बोटांनाही फुटली पाने , अंगावरती फुटल्या फांद्या
कपडे पार फाटून गेले, झाल्या त्यांच्या चिंध्या.
मस्त वारा येत होता मजेत होतो डोलत
उद्यापासून नाही शाळा स्वत:शीच बोलत
संध्याकाळ होऊ लागली होती किती छान
किती आनंदात मी डोलत होते प्रत्येक पान.

सूर्य मावळला होता पडू लागला अंधार
आला तिथे एक कावळा बसला नाकावर पार
असेच आले, चिमणी बगळे, मग आली वाटवागळे
मी म्हणालो काय रे देवा यांनी तर केले वाटोळे.



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

गप्प राहिलो तसाच आणि झोपी गेला प्रत्येक जण
मी उभा  टाकत  सीओ2 आणि घेत ऑक्सिजन
सकाळ होताच छान वाटले  मस्त गार वारा
स्वच्छ सूर्य प्रकाश घेण्यात आनंद वाटला खरा.

पक्षी गेले उडून दूर, सूर्य लागला चढायला,
गारवा कमी झाला ऊन चटके लागले वाढायला
चटके सहन करण्याशिवाय काही नव्हते गत्यंतर
पळालो असतो सावलीत , जर पाय असते तर !

सायंकाळी बागेत आले झाड फिरायला ज्ञान बनून
आले माझ्याजवळ विचारात कसे वाटते झाड म्हणून
शांत मला पाहून त्याने तोडली माझी पाने
आई ग !ओरडलो जोरात, जे ऐकले होते त्याने.

ज्ञान म्हणजेच झाड म्हणाले, “दुखले  ना फार ?”
एकच पान तोडले तुझे बिघडले नाही फार
तूच म्हणाला होतास असे माझे पान तोडताना
आता कळत असतील वेदना तुला अश्रु काढताना

झाड म्हणजेच ज्ञान म्हणाला मित्रा मला माफ कर
माझ्या खूप चुका झाल्या मन तुझे साफ कर
मला उमगते आहे मित्रा  झाडलाही होते इजा
कधीच पाने, फांद्या तोडणार नाही हा शब्द माझा
असे म्हणताच ज्ञान झाड, व झाड परत ज्ञान झाले
झाडांनाही जीव असतो याचे तेव्हाच  ज्ञान झाले.
म्हणूनच म्हणतो मित्रांनो , झाडे लावा, झाडे जगवा
आपला जीव जसा, तसा दुसऱ्यांचाही ध्यानात ठेवा…….. सौ शामला  अभिजीत क्षीरसागर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>पील्लू मणीमाऊचे !!</u>

गोंडस असे पील्लू माझ्या सुंदर मणीमाऊचे

चीमुकले निळसर डोळे आणि पाय त्याचे इवलेसे

मऊ गुबगुबित केस त्याचे दात जणू मोत्यांचे

कान त्याचे टवकारलेले आणि शेपूट जणू कापसाचे

शुभ्र असा रंग त्याचा मद्दे ठिबके काळ्या रंगाचे

खेळताना त्याने मारले ओरखडे कोवळ्या नखांचे

तरी कुरवाळून भरवितो मी त्याला घास दूध भाताचे

गोँडस असे पील्लू माझ्या सुंदर मणीमाऊचे

................................काविकुमार





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

<u>मनीमाऊ</u>



मनीमाऊ ,मनीमाऊ
करते म्याव म्याव
हळूच उघडून डोळे, बघते
खाते फार भाव

उंदीरमामा तुझा पेढा
दुध तुझी बासुंदी
पोळीवरही मारी ताव
सावध असे पदोपदी

तुला बघून उंदीर मामा
पाळतो बिळात धु...म
त्याला शोधता शोधता
मात्र तू होतेस घामाघूम



वाघाची  तू आहेस मावशी
घाबरट मात्र अशी कशी?
येता आई घरात
धूम ठोकते दारात

सौ अनुराधा अशोक कुलकर्णी
नाशिक



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

माझे नाव पप्पू "..!

करतो खूप खोड्या
माझे नाव पप्पू
रागवते मग आई
देते दोन टप्पू ....||



अभ्यास मी करतो
कविता मी म्हणतो
खुशीत म्हणते ताई
खाऊ घे रे पप्पू ........||

लवकर मी झोपतो
लवकर मी उठतो
वेळेवर शाळेत जातो
सर- म्हणती - गुड -गुड ..पप्पू.....!||


-अरुण.वी देशपांडे -पुणे.



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*<u>गोड गोड चिकोबा</u>*

-अरुण.वि .देशपांडे -पुणे



गोड गोड चिकोबा

आहे मोठा लाडोबा ... ||

टीव्ही समोर उभा राहतो

फेर धरुनी -नाच करतो

स्वताच नवा फुगा फोडतो

अन- मोठ्याने भोकाड पसरतो ..||

आज्जी बरोबर भुर्र .. जातो

गोड चाकलेट आणतो

भैया जवळ येता

थोडे थोडे त्याला देतो...............||

असा हा लाडोबा

गोड गोड चिकोबा .......



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*<u>खूप खूप फिरावे ..!</u>*

-अरुण वि .देशपांडे -



खूप खूप फिरावे
फिरण्याने माहिती होते
खूप खूप पहावे
पाहण्याने माहिती होते ............||
खूप खूप वाचावे
वाचनाने ज्ञान वाढते
खूप खूप लिहावे
लिहिण्याने ज्ञान वाढते ...........||
योग्य तेच बोलावे
योग्य तेच सांगावे
बोलण्याने खूप कळते
सांगण्याने खूप कळते .............||
-------------------------------------



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*कोकण .. "*  -अरुण वि .देशपांडे -



कोकणात मित्रा
कुठेही थांबावे
हापूस आंबा
हसुनी खुणावे ...||
फणसाच्या रुपावरी
मुळीच जाऊ नका
असतील काटे
गरे सोडू नका ....||



रस्त्याच्या बाजू
चिकू आणि काजू
करण्या स्वागत
उभे आजुबाजू ....||
हिरव्या माडांची
रांग किती छान
शहाळ्याच्या पाण्याने
भागते तहान .....||



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*<u>शाळेतले दिवस..!</u>* -अरुण.वि. देशपांडे-पुणे.



शाळेतले दिवस
शाळेतले मित्र
डोळे मिटता
उभे राही चित्र ...||
शाळेतले दिवस
किती मस्त
नव्हती महागाई
सगळे स्वस्त ....||
वर्गातला तास
नसे टाईमपास
शिकवायचे सर
कित्ती खास ......||
दुपारच्या सुट्टीत
मित्रांच्या संगे
झाडांच्या सावलीत
खेळ किती रंगे .....||



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*बंड्र आणि खंड्र*

-अरुण वि .देशपांडे -पुणे.



बंड्र आणि खंड्र
खेळत होते दोघे चेंड्र ....||
खेळता खेळता खंड्र पडला
बंड्र त्याला हसू लागला
खंड्रने मारला एक धपाटा
बंड्रने घातला एक रपाटा ....||
भांडता भांडता घोटाळा झाला
मध्येच एक पोरगा आला
चेंड्र घेऊन धुम्म पळाला
भांडणात तिसऱ्याचा लाभ झाला .....||

*****************************************



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*"पोपटराम .."* -अरुण.वि .देशपांडे -पुणे.



आमच्या घरचा पोपटराम

सदा म्हणतो - राम राम !...||

हिरवी चुटूक मिरची खातो

खुशीत असता शीळ घालतो

माझ्या संगे कविता म्हणतो

माझ्या सवे गाणे गातो ...........||

गोड गोड पेरू खातो

झुल्यावर झुलत पेंगतो

काढून झोप छान

हसून म्हणतो "राम राम "......

असा आमचा पोपट राम ..........||

***********************************



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

*बाहुला बाहुलीचं लगीनं*

यमीचा बाहुला

सुमीची बाहुली

बाहुला बाहुलीचं लगीनं

बाहुली नटली

वरमाय हटली

बाहुला घोडीवर चढेना

विहिणबाईंनी

विनवणी केली

करवली आली

विनवायाल

दादाने मग कानच धरला

बाहुला घोडीवर चढेना

यमीचे रुसणे थमेना

सुमीने रंगीत रिबनी

देऊ केल्या

नवीन पेन

देते म्हणाली

यमीचा रुसवा काही निघेना

बाहुला घोडीवर चढेना

तिकडुन मग

बाहुली आली

तुझ्याशी लगीन

नकोच म्हणाली

यमी अन बाहुला गपचुप गार

बाहुला चढला घोडीवर

यमीने रुसवा मागे घेतला

लगीन सोहळा पार पडला..!

(भोंडल्यांच्या गाण्याच्या चालीवर

म्हणुन पहा..!)

रजनी अरणकल्ले.





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## *ठो द्या ठो द्या ठो,*



ठो द्या ठो द्या ठो,
कपाळावर कपाळ आपटलं,

कपाळाचं बिंग फुटलं,
तेथुन शिंग ऊगवलं,

शिंगात शिंग अडकलं,
दोघांचं चांगलच जुंपलं,

आईने त्यांना सोडवलं,
दोघांना कुशित घेतलं,

दोघे आईला बिलगले,
खुदू खुदू हसु लागले..!

-रजनी अरणकल्ले



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )



<u>*एक गोष्ट*</u>

मुलांनो,तुम्हाला एक गोष्ट
सांगते,
तेंव्हा आकाश ज़रा ठेंगण होते,
सर्वांच्या हाती येत होते,
शेतात भरपूर धान्य पिकतसे,
रान नेहमीच हिरवे गार असे,

ती म्हातारी एकटीच रहातसे,
आकाशिचे चंद्र, तारे सारे,
खेळायाला येई मुलांसंगे,
म्हातारिही खेळे चंद्रासंगे,
सगळे कसे मजेत चालले होते,

एकदा काय झाले,
म्हातारी उदास झाली,
काही केल्या हसेच ना,
काय झाले, कोणालाही कळेना,
वाकून अंगण झाडत होती,

चंद्राने मारली पाठीवर थाप,
तिला वाकुल्या दाखवे, हसे खुप
खेळ खेळ म्हणु लागला,
म्हातारीला राग आला ,
म्हणाली, चंद्रा त्रास देऊ नको ना,

तरीही चन्द्र काही ऐकेच ना,
म्हातारिने झटकन झाडू उगारला,
चंद्राला त्याचा फटका बसला,
चन्द्र म्हातारीवर रुसला,
वर वर चालता झाला,
जाताना आकाशाही घेउन गेला.!!
--
ऐका तर, या गोष्टीचे सार सांगते,
मिळालय ना, तर जपून ठेवा ते,
ग्रांटेड, असे समजू नका ते,
जाईल नाही तर निसटुन असे,
हातून निसटले,आकाश जसे,
ही कविकल्पनेची गोष्ट खरी,
खरे नाही वाटत का, सांगा तरी,
चंद्रावर ती खूण पहा ना,
म्हातारीचा फटका दिसला ना !!

रजनी अरणकल्ले-



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

वाघोबा म्हणतो खाऊ का तुला
लांडगोबा म्हणतो खाऊ का तुला
मी म्हणते थांब जरा
खाशील काय हाडं नी काडं

लेकीकडे जाईन तुप रोटी खाईन
लठ्ठ गुठ्ठ होईन मग तु मला खा

लेकीकडे गेले गाय गोठा पाहिला
भंडार घर पाहिलं मन तृप्त झालं
आता ना कसली भीती ना चिंता
वाघोबा येऊ दे, लांडगोबा येऊ दे

घेतला निरोप आवरला गहिवर
दिली तीने तुप रोटी शिदोरीला

आई, काळजी घे,लठ्ठ गुठ्ठ हो
नातवाशी खेळायला ये पुन्हा
मनाने घेतली ऊभारी
भोपळ्यात जाऊन बसले

चल रे भोपळ्या टुणुक टुणुक
वाघोबा, लांडगोबा टुक टुक



रजनी अरणकल्ले



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

बाप्पा थैंक्स

काल माझ्या स्वप्नात आला बाप्पा,
रात्री आम्ही मारल्या खुपच गप्पा,

पहाटेची चाहुल लागली ,
सुर्याजिची स्वारी येवू घातली,

बाप्पा मग निघतो म्हणाला,
निघताना एक माउस हाती दिला,

म्हणाला क्लिक कर, जा सफरिला,
सहलीला जायाचे, जगभर फिरायचे,

उंदराला(माउस) कसे बरे वाहन
करायचे?
"आ"वासून पहातच राहिले,

बाप्पाला, बाय बाय करायचे विसरले!
बाप्पा हसला, निघून गेला,

हातातल्या माउसवर,क्लिक केले,
बसल्याजागी सफरिला निघाले,

पहाट गेली,सकाळ सरली,दुपारही
टळली!
माउस क्लिक करता करता सायंकाळ
झाली!
बाप्पा कडून मला गिफ्ट छान
मिळाली,
सैरसपाट्याची हौस माझी भागली,

गणपति बाप्पा थैंक्स तुला देते,
गिफ्ट तुझी छान आहे,सगळ्याना
सांगते!

रजनी अरणकल्ले





©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## आई आणखी बाबा यांतुन कोण आवडे अधिक तुला?

सांग मला रे सांग मला
आई आणखी बाबा यांतुन, कोण आवडे अधिक तुला ?
आई दिसते गोजिरवाणी, आई गाते सुंदर गाणी
तर्‌हेतर्‌हेचे खाऊ येती, बनवायाला सहज तिला
आई आवडे अधिक मला
गोजिरवाणी दिसते आई, परंतु भित्री भागुबाई
शक्तिवान किती असती बाबा थप्पड देती गुरख्याला
आवडती रे वडिल मला
घरात करते खाऊ आई, घरातल्याला गंमत नाही
चिंगम अन्‌ चॉकलेट तर, बाबा घेती रस्त्याला
आवडती रे वडिल मला
ग. दि. माडगूळकर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## एक होता काऊ

एक होता काऊ, तो चिमणीला म्हणाला
मला घाल न्हाऊ, घाल न्हाऊ, घाल न्हाऊ

एक होता पोपट, तो चिमणीला म्हणाला
तू मला थोपट, तू मला थोपट, तू मला थोपट

एक होती घूस, ती चिमणीला म्हणाली
तू माझे अंग पूस, तू माझे अंग पूस, तू माझे अंग पूस

एक होती गाय, तिने चिमणीला विचारले
तुझे नाव काय?, तुझे नाव काय?, तुझे नाव काय?

एक होते कासव, ते चिमणीला म्हणाले
मला चड्डी नेसव, मला चड्डी नेसव, मला चड्डी नेसव

मंगेश पाडगांवकर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## चंदाराणी, का ग दिसतेस थकल्यावाणी?

चंदाराणी, चंदाराणी
का ग दिसतेस थकल्यावाणी?

शाळा ते घर, घर ते शाळा
आम्हां येतो कंटाळा
रात्रभर तू चाल-चालसी
दिवसातरी मग कोठे निजसी?

वारा-वादळ छप्पनवेळा
थारा नाही आभाळा
कसा गडे तू तोल राखसी?
पुढती पुढती पाय टाकिसी

काठी देखील नसते हाती
थोडी नाही विश्रांती
चढसी कैसी? कशी उतरिसी?
निळ्या डोंगरी अखंड फिरसी

वाडा-घरकुल-घरटे नाही
आई नाही, अंगाई
म्हणूनच का तू अवचित दडसी?
लिंबामागे जाऊन रडसी?

ग. दि. माडगूळकर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

झुक झुक झुक झुक अगीनगाडी

झुक झुक झुक झुक अगीनगाडी
धुरांच्या रेघा हवेत काढी
पळती झाडे पाहू या
मामाच्या गावाला जाऊ या ||धृ.||

मामाचा गाव मोठा
सोन्याचांदीच्या पेठा
शोभा पाहून घेऊ या ||१||

मामाची बायको गोरटी
म्हणेल कुठली पोरटी
भाच्यांची नावे सांगू या ||२||

मामाची बायको सुगरण
रोजरोज पोळी शिकरण
गुलाबजामून खाऊ या||३||

मामा मोठा तालेवार
रेशीम घेईल हजार वार
कोट विजारी लेवू या ||४||

ग. दि. माडगूळकर



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## टप टप टप काय बाहेर वाजतंय ते पाहू

टप टप टप काय बाहेर वाजतंय ते पाहू
चल गं आई, चल गं आई पावसात जाऊ

भिरभिर भिरभिर अंगणात बघ वारे नाचतात
गरगर गरगर त्यासंगे चल गिरक्या घेऊ

आकाशी गडगडते म्हातारी का दळते
गडड गुडुम गडड गुडुम ऐकत गे राहू

या गारा कश्या कश्या आल्या सटासटा
पट पट पट वेचूनिया ओंजळीत घेऊ

फेर गुंगुनी धरू भोवऱ्यापरी फिरू
ये पावसा घे पैसा गीत गोड गाऊ

पहा फुले लता तरू चिमणी गाय वासरू
चिंब भिजती मीच तरी का घरात राहू



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## ससा तो ससा की कापूस जसा

ससा तो ससा की कापूस जसा
त्याने कासवाशी पैज लाविली
वेगे वेगे धावू नि डोंगरावर जावू
ही शर्यत रे अपुली

चुरुचुरु बोले तो तुरुतुरु चाले
नि कासवाने अंग हलविले
ससा जाई पुढे नि झाडामागे दडे
ते कासवाने हळू पाहियले
वाटेत थांबलेला कुणाशी बोलले ना
चालले लुटुतुटु पाही ससा

हिरवी हिरवी पाने नि पाखरांचे गाणे
हे पाहुनिया ससा हरखला
खाई गार चारा घे फांदीचा निवारा
तो हळूहळू तेथे पेंगुळला
मिटले वेडे भोळे गुंजेचे त्याचे डोळे
झाडाच्या सावलीत झोपे ससा

झाली सांजवेळ तो गेला किती काळ
नि शहारली गवताची पाती
ससा झाला जागा तो उगा करी त्रागा
नि धाव घेई डोंगराच्या माथी
कासवा तेथे पाही ओशाळा मनी होई
'निजला तो संपला' सांगे ससा (शांताराम नांदगावकर)



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

## <u>गोड गोजिरी लाज लाजरी</u>

गोड गोजिरी लाज लाजरी ताई तू होणार नवरी
फुलाफुलांच्या बांधून माळा मंडप घाला गं दारी

करकमलांच्या देठावरती चुडा पाचूचा वाजे
हळदीहूनही पिवळा गाली रंग तुला तो साजे
नथनी बुगडी नाचेsss
रूप पाहुनी तुझे ??? मनी मंगळ सरी

भरजरीचा शालू नेसुनी झाली ताई आमुची गौरी
लग्नमंडपी तिच्या समोरी उभी तिकडची स्वारी
अंतरपाट धरीsss
शिवा पार्वती वरी, लाडकी ही जाई ताई दुरी

पी. सावळाराम



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

बालमित्रांनो तुम्हाला हा अंक *कसा वाटला ? आम्हाला तुमच्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्या. आमचा मेल आयडी* balnetakshari@gmail.com *हा आहे .*

*बालनेटाक्षरीचे आधीचे अंक तुम्ही* http://balnetakshari.blogspot.in/ *येथे वाचू शकतात व डाउनलोड करू शकतात. ह्या ब्लॉगवर लहान मुलांसाठी मनोरंजनाचा खजिनाच आहे. मग ह्या ब्लॉगला भेट द्या आणि आपल्या मित्रांना सुद्धा येथे आमंत्रित करा .*

*फेसबुक वर आमच्या पेजला येथे विझिट द्या*

*https://www.facebook.com/pages/%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A4%A8%E0%A5%87%E0%A4%9F%E0%A4%BE%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B7%E0%A4%B0%E0%A5%80/189108961185993*

## *अनघा हिरे*

# ई साहित्य प्रतिष्ठान

# आपले आभारी आहे



©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )

©बाल-नेटाक्षरी (ई साहित्य प्रतिष्ठान 2012 )